# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३१–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. आण्णासो रामचंद्र शिंदे,<br>मु.पो. अंतराळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. आण्णासो रामचंद्र शिंदे, मु.पो. अंतराळ, ता. जत, जि. सांगली, यांनी गट क्र. ६६ मध्ये ३ अश्वशक्ती नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. २३.४.२०१० रोजी वि.प.कडे अर्ज केला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार सर्व्हीस केक्शन आहे त्यांना ७.५.२०१० पर्यंत चलन मिळणे जरुर होते, परंतु ते वि.प.ने आजतागायत दिले नाही. त्यामुळे प्रस्तुत तक्रार मंचासमोर दि. १९.६.२०१० रोजी दाखल केली आहे. त्यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.४.२०१० तक्रार नोंदविली. अंतर्गत कक्षाचे आदेश क्र. ५२४० दि. २८.४.२०१० रोजी पारित झाले, त्यामध्ये कृती मानके तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्यास ग्राहकास द्यावयाच्या भरपाई बाबत आदेश दिले.

अंतर्गत कक्षाच्या या आदेशाच्या विरुध्द तक्रारदाराने मंचाकडे तक्रार नोंदवून दि. ७.५.२०१० पासून प्रत्यक्षात चलन मिळालेल्या तारखेपर्यंतच्या विलंबाबाबत भरपाई मिळावी अशी मागणी केली.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.७.२०१० च्या लेखी अहवालात दि. २३.४.२०१० रोजी तक्रारदाराचा अर्ज मिळाल्याचे मान्य केले व त्यांस दि. ७.७.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे असे सांगितले.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. तक्रारदाराचे प्रतिनिधी यांचे म्हणणे की, दि. ७.५२०१० पर्यंत चलन देणे जरुरी होते ते दिले नाही त्यामुळे भरपाई देणेत यावी. या उलट, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता यांनी दि. ७.७.२०१० रोजी चलन दिले आहे, एल.टी. सर्व्हीस कनेक्शन आहे असे सांगितले. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदाराची विनंती दि. ७.५.२०१० ते चलन दिल्याची तारीख दि. ७.७.२०१० या कालावधीच्या विलंबापोटी भरपाई मिळावी ही मागणी योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

वरील लेखी/ तोंडी विवेचनानुसार तक्रारदार यांनी वीज मागणी अर्ज दि. २३.४.२०१० ला दिल्याचे वि.प.स मान्य आहे. मुदतीत म्हणजे तक्रारदाराचे म्हणण्यानुसार दि. ७.५.२०१० पर्यंत चलन देण्यात आले नाही हे खरे आहे, मात्र प्रतिनिधीची सदर मागणी चुकीची आहे. दि २३.४.२०१० रोजी अर्ज केल्याचे उभयतांनी मान्य केले असल्याने ग्रामीण भागात अर्ज मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत म्हणजेच दि.१२.५.२०१० पर्यंत खर्चाचे चलन देणे विनियमास अपेक्षित आहे. त्यामुळे भरपाईसाठी दि.१३.५.२०१० ते ७.७.२०१० या ७ आठवड्यांच्या कालावधीसाठी रु. १००/– प्रति आठवडा भरपाई देणे योग्य आहे. चलन दि. ७.७.२०१० रोजी देण्यात आले आहे. परंतु वि.प.ने आपल्या लेखी अहवालात दि ७.५.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते किंवा नाही याबद्दल कांही ऊहापोह केला नाही. त्यामुळे कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात वि.प.ला अपयश आल्याने कृती मानके सोबतच्या परिशिष्ट अ मधील तरतुदीनुसार ८ आठवड्यांचा विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– भरपाई मिळणेचा तक्रारदाराचा हक्क आहे, त्यामुळे तक्रार मंजूर करण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदार यांस दि. १३.५.२०१० ते ७.७.२०१० या काळातील विलंबाच्या ७ आठवड्यासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ७००/– कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात वि.प.ला अपयश आल्याने भरपाई द्यावी.

३) वीज जोडणी दिल्यानंतर वि.प.ने सदर रकमेचे २ बिलींग सायकलमध्ये समायोजन करावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष